


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान


अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४




■ वर्ष ७५ वे/अंक २६९ वा ■ ■ अमरावती,रविवार,दिनांक १८ मे २०२५ ■ ■संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर ४ ज्येष्ठ १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■

## डोनाल्ड ट्रम्प यांची पुन्हा कोलांटउडी

वॉशिंग्टन दि. १७ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध रोखण्यात मोठी भूमिका बजावल्याचा दावा केला आहे. दोन्ही देशांमधील तणाव इतका वाढला होता की ते अणुयुद्धाच्या अगदी जवळ पोहोचले होते, असे ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांनी शुक्रवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत पुन्हा एकदा दावा केला. परिस्थिती खूप गंभीर झाली, पुढचे पाऊल काय असते, तुम्हाला माहिती आहे, शब्द नाही म्हणजेच अणुयुद्ध असे ट्रम्प म्हणाले. परराष्ट्र धोरणाच्या यशाबद्दल ट्रम्प म्हणाले की भारत-पाकिस्तान युद्ध थांबवणे हे त्यांच्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे. तथापि, त्यांना श्रेय मिळालं नाही.



**ट्रम्प म्हणाले, मी शांततेसाठी व्यवसाय वापरत आहे**

ट्रम्प म्हणाले की त्यांनी युद्ध थांबवण्याच्या बदल्यात त्यांच्याशी व्यापार करण्याचा प्रस्ताव दोन्ही देशांना दिला होता. आता मी हिशेब चुकता करण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी व्यवसाय वापरत आहे.

**भारत-पाकिस्तान युद्धबंदीवरील ट्रम्प यांचे ५ जुने दावे**

१० मे : युद्धबंदीवरील पहिले विधान, युद्ध थांबवण्याचा दावा

भारत आणि पाकिस्तान युद्धबंदीवर सहमत झाले आहेत. सामान्य ज्ञान आणि समजूतदार निर्णय घेतल्याबद्दल मी दोन्ही देशांचे अभिनंदन करतो.

११ मे : मी काश्मीर *(पान २ वर)*

## महायुती फुटली ?

## नवी मुंबईत शिवसेनेचे एकला चलो अमरावतीमध्ये भाजप स्वबळावर

मुंबई दि. १७ : महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुका सप्टेंबर अथवा ऑक्टोबरमध्ये होण्याची शक्यता आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. कोर्टाच्या आदेशानंतर राजकीय पक्षाने निवडणुकीची तयारी जोरात सुरू केली आहे. सत्ताधारी महायुती (भाजप, शिवसेना-शिंदे गट, राष्ट्रवादी-अजित पवार गट) एकत्रितपणे निवडणुका लढवणार असल्याचे देवेंद्र फडणवीस अन् एकनाथ शिंदे यांनी सांगितलेय. पण काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होऊ शकतात. मुख्यमंत्र्यांनी तयारीवर जोर दिला आहे, तर शिवसेनेने रणनीती आखली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती एकमेकांसमोर उभे ठाकण्याची शक्यता आहे. नवी मुंबई आणि अमरावती दोन्ही ठिकाणी भाजप आणि शिवसेनेकडून स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे.

शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश मस्के यांनी नवी मुंबईत स्वबळावर लढण्याचे संकेत दिले. तर दुसरीकडे भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा यांनीही अमरावती महापालिकामध्ये भाजप स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केलेय. त्यामुळे महापालिका निवडणुकीत महायुती एकमेकांसमोर उभे राहणार असल्याचे चित्र दिसतेय.

नवी मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याचे *(पान २ वर)*

## अमरावती मनपा भाजप स्वबळावर लढणार : नवनीत राणा



अमरावती दि. १७ : सध्या राज्याला महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडुकीचे वेध लागले आहे. आगामी काही दिवसांत या निवडणुकीची घोषणा होणार आहे. त्यामुळेच राज्यातील सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. महापालिकेच्या निवडणुकीसाठी त्या-त्या भागातील वजनदार नेते विजयाचं गणित आखण्यात व्यग्र झाले आहेत. असे असतानाच आता अमरावती येथून एक मोठी माहिती मिळत आहे. येथे भाजपाच्या नेत्या नवनीत राणा यांनी मोठी घोषणा केली असून या घोषणेचे वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत.

**कोणत्याच पक्षासोबत युती करणार नाही : नवनीत राणा**

नवनीत राणा यांनी अमरावती महानगरपालिका निवडणुकीबाबत मोठी भूमिका घेतली आहे. त्यांनी या निवडणुकीसाठी स्वबळाचा नारा दिलाय. अमरावती महानगरपालिका भाजप एकट्याने लढवणार आहे. कोणत्याच पक्षासोबत युती करणार नाही, असं नवनीत राणा यांनी थेट स्पष्ट केलंय. ही घोषणा करून त्यांनी एका प्रकारे *(उर्वरित पान २ वर)*


## मान्सूनचा महाराष्ट्रात वेळेआधीच धडकणार

पुणे दि. १७ : मान्सूनने सध्या श्रीलंकेच्या दक्षिण भागापर्यंत मजल मारली आहे. तसेच बंगालच्या उपसागरात, मालदीव आणि कोमोरीन भागातही त्याने प्रगती केली आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रात पूर्वमोसमी पावसाला पोषक हवामान निर्माण झालं असून, अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने पुढील पाच दिवसांत काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

मानसूनच्या वाटचालीसाठी सध्या पोषक वातावरण असल्याची माहिती आहे. त्यामुळे सर्वसाधारण वेळेआधीच मानसून पडणार आहे. गुरूवारी मानसूनने दक्षिण *(पान २ वर)*

## आम्ही अणुबॉम्बच्या धमकीला भीक घालत नाही : अमित शाह

नवी दिल्ली दि. १७ : पहलगाम हल्ल्याचा बदला घेताना भारताच्या सैन्यदलांनी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले होते. तसेच या कारवाईला पाकिस्तानने प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केल्यावर भारतीय सैन्यदलांनी पाकिस्तानच्या हवाई तळांवर तुफानी हल्ला चढवत जबर नुकसान केले होते. त्यामुळे पाकिस्तानला युद्धविरामासाठी विनवणी करणे भाग पडले होते. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मोठं विधान केलं आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला विकसित बनवण्यामध्ये कुठलीही कसर बाकी ठेवलेली नाही. देशाला सुरक्षित ठेवण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. २०१४ पूर्वी नेहमी दहशतवादी हल्ले व्हायचे. अनेक कटकारस्थाने व्हायची. मात्र त्याला काहीच उत्तर दिलं जात नव्हतं. मात्र आता असं होत नाही. *(उर्वरित पान २ वर)*

## पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली यूट्यूबर ज्योती मल्होत्रासह सहा जणांना अटक

नवी दिल्ली दि. १७ : पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरविल्याबद्दल सहा भारतीय नागरिकांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये हरियाणाच्या एका यूट्यूबर तरुणीचाही समावेश आहे. पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची साखळी हरियाणा आणि पंजाबमध्ये सक्रिय असल्याचे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले आहे. या साखळीत एजंट, आर्थिक सहाय्य करणारे आणि माहिती पुरविणारे लोक कार्यरत आहेत. हिसारमधील सिव्हिल लाईन्स पोलिसांनी सहा जणांना अटक केली.



यूट्यूबर तरूणीचे नाव ज्योती मल्होत्रा असून तिचे यूट्यूबवर 'ट्रॅव्हल विथ जो' या नावाचे चॅनेल आहे. सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योती मल्होत्राने कमिशन एजंटकडून व्हिसा मिळवून २०२३ साली पाकिस्तानचा दौरा केला होता. या दौऱ्यात दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या एहसान-उर-रहीम *(उर्वरित पान २ वर)*

## पाकिस्तान म्हणजे मानवतेला धोका : ओवैसी

हैद्राबाद दि. १७ : एआयएमआयएमचे प्रमुख हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी पाकिस्तानवर जोरदार हल्ला चढवला. पाकिस्तान हा दहशतवादाचा प्रायोजक आहे. पाकिस्तानने आतापर्यंतच्या सर्व घटनांतून सिद्ध केले आहे की पाकिस्तान हा देश मानवतेसाठी धोका बनला आहे. भारताला आता आंतरराष्ट्रीय समुदायाला हे दाखवून द्यावे लागेल की गेल्या अनेक दशकांपासून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादात भारतीयांचे बळी जात आहेत आणि हे खपवून घेतले जाणार नाही, *(पान २ वर)*



## माहोल....




यार असे ऑपरेशन सिंदूर वगैरे झाले पाहिजे म्हणजे लोकांना देशभक्तीचे डोस देता येईल आणि निवडणूक जिंकता येईल!!

## भारत सरकार ४० खासदारांचे ७ शिष्टमंडळ परदेशात पाठवणार

नवी दिल्ली दि. १७ : ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर आता भारत सरकार दहशतवादाविरुद्ध पाकिस्तान सरकारचा पर्दाफाश करणार आहे. अशा परिस्थितीत सरकार वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या खासदारांना परदेशात पाठवण्याची तयारी करत आहे. खासदारांचे शिष्टमंडळ अमेरिका, ब्रिटन आणि यूएईला जाणार आहे. यावेळी शिष्टमंडळ ऑपरेशन सिंदूरच्या यशावर आणि जगभरातील दहशतवादावर चर्चा करेल. माहितीनुसार, भारताच्या शिष्टमंडळात *(पान २ वर)*

## शक्ती असेल तर जगाला प्रेमाची भाषा कळते : मोहन भागवत

जयपूर दि. १७ : भारत आणि पाकिस्तान दरम्यान तणाव सुरु असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ( आरएसएस ) प्रमुख मोहन भागवत यांचे एक महत्वाचे वक्तव्य समोर आले आहे. जयपूरातील एका कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ( आरएसएस ) प्रमुख मोहन भागवत म्हणाले की आपल्या ताकद असेल तर जगाला आपण प्रेमाची भाषेत सांगू शकतो, समजावू शकतो.



शक्ती असेल तर जग प्रेमाची भाषा देखील समजते असेही ते म्हणाले.त्यांनी आपल्या भाषणात भारताची प्राचीन संस्कृती आणि त्यागाच्या परंपरेला उजाळा दिला.ते पुढे म्हणाले की भारताच्या इतिहासात भगवान श्री रामापासून *(उर्वरित पान २ वर)*

## राज्यात अवकाळीचा जोर वाढला; अनेक जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह झाला तुफान पाऊस

पुणे दि. १७ : राज्यात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. अनेक जिल्ह्यांत अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. आज देखील रजयच्या विविध भागात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे उकाड्यापासून नागरिकांची सुटका झाली आहे. तर अवकाळी पावसामुळे शेतीचे देखील मोठे नुकसान झाले आहे.

नांदेड जिल्ह्यात देखील पावसाने हजेरी लावली. सोसाट्याचा वारा आणि गडगडाट होऊन अवकाळी पाऊस नांदेड शहरात कोसळत होता. काल रात्री नांदेड शहराला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. सखल भागात पाणी साचलेले दिसून आले.

**नंदुरबारमध्ये मुसळधार पाऊस**

राज्यात यावर्षी अवकाळी पावसाचा कालावधी अधिक लांबला *(उर्वरित पान २ वर)*



















